सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ४३१००५

Web site : www.gpabad.ac.in

## प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम (पॉलिटेक्निक) शै. व. २०२४-२५ संस्थास्तर प्रवेश प्रक्रिया फेरी सूचना

## शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेण्याची सुवर्णसंधी

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम प्रवेश माहिती पुस्तिका २०२४-२५ (नियम-१३) नुसार शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर येथे प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांकरीता संस्था स्तरावर रिक्त असलेल्या जागांवर प्रवेशासाठी दिनांक **२२/१०/२०२४** रोजी समुपदेशनाने **शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर** येथे संस्था स्तरावर खालीलप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

१) ज्या विद्यार्थ्यांनी CAP किंवा Non-CAP प्रथम वर्ष प्रवेशासाठी www.poly24.dtemaharashtra.gov.in व थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी www.dsd24.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली आहे असे सर्व विद्यार्थी या फेरीसाठी पात्र समजण्यात येतील.

२) सदर प्रवेश प्रक्रियेसाठी दिनांक **२२/१०/२०२४** रोजी सकाळी **१०:३०** ते दु. **०१:३०** वाजेपर्यंत संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहून अर्ज करावा, त्यानुसार विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करून त्याच दिवशी सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. दुपारी **०१:३०** वाजेनंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

३) सदर प्रवेश फेरी करिता उपलब्ध रिक्त जागांवर शासन नियमानुसार (रिक्त जागा ज्या प्रकारची आहेत्याप्रमाणे) प्रवेश फेरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ त्याच दिवशी प्रवेश निश्चित करावा लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश शुल्क व आवश्यक मुळ प्रमाणपत्रे सोबत आणावीत तसेच प्रवेश निश्चितीच्या वेळी प्रवेश शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरावे लागेल.

४) संस्थेत रिक्त असलेल्या जागांची माहिती संस्थेच्या www.gpabad.ac.in या संकेत स्थळावर दि.२१/१०/२०२४ रोजी प्रसिध्द केली जाईल.

स्वाक्षरीत/-
( डॉ. आ. मा. जिंतूरकर)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर